| | नवी मुंबई महानगरपालिका | Navi Mumbai Municipal Corporation |
|---|---|---|
| | नमुंमपा शाळा क्र. 102, सेक्टर 4,<br>नेरूळ, नवी मुंबई 400706<br>दूरध्वनी क्र. 2770766 | NMMC School No. 102, Sector 4,<br>Nerul, Navi Mumbai 400706<br>Phone 2770766 |

अतितात्काळ

जा.क्र.नमुंमपा/बिविने/5811 /2023

दिनांक :-21 /06 /2023

प्रति,

**अध्यक्ष / सचिव,**

कॉस्मोपॉलिटन सोसायटी ॥,

पुनित पार्क, प्लॉट नं. 182 सी,

सेक्टर 17, नेरूळ (प),

नवी मुंबई 400706. (G+7 Stories) A, B, C & D Wing.

**विषय :- <u>धोकादायक इमारती निष्कासीत करणेबाबत.</u>**

संदर्भ :- 1. धोकादायक इमारती घोषीत करणेबाबत समितीची दि.27.04.2013 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

2. मा. आयुक्त सो. यांची दि.10.05.2023 रोजीची मान्यता.

3. मा. उप आयुक्त (अतिक्रमण) यांचेकडील पत्र क्र. नमुंमपा/अति/धो.ई./टे.क्र.08/1153/2023, दि.22.05.2023

4. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 264 चे उपकलम 1.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील धोकादायक इमारती घोषीत करणेबाबत धोकादायक इमारत समितीची बैठक दि.27.04.2023 रोजी आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीत कॉस्मोपॉलिटन सोसायटी – ॥, पुनित पार्क, भूखंड क्रमांक 182 सी, सेक्टर 17, नेरूळ (प), नवी मुंबई (G+7 stories) A,B,C & D Wing या इमारतीचा विषय ठेवण्यात आलेला होता.

तरी उक्त विषयाच्या अनुषंगाने, महापालिका धोकादायाक इमारती समितीने शासन परिपत्रक क्र. विसआ-2015/प्र.क्र.349/नवि-20, दिनांक 05 नोव्हेंबर 2015 नुसार आपली इमारत **सी-1 (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासीत करणे प्रवर्गामध्ये मोडणा-या)** वर्गवारीत घोषीत करण्यात आलेली आहे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 264 चे उपकलम 1 अन्वये आपणांस निर्देशित करण्यात येते की, आपली इमारत अतिधोकादायक असून राहण्यास अयोग्य असल्याने सदर इमारतीमधील रहिवाश्यांना सदरची इमारत रिकामी करण्याबाबत आपल्याकडून सूचना देण्यात याव्यात. इमारतींच्या अवती भवती पत्र्याचे कुंपण आपल्या सोसायटीमार्फत टाकून संरक्षित करावेत, आपली इमारत जिर्ण झालेली असून कधीही मोडकळीस येऊ शकते अश्या आशयाचे फलक दर्शनी भागात लावावा व इमारतीत कोणीही प्रवेश करणार नाही यासाठी सुरक्षा यंत्रणा उभारावी, तसेच आपल्या इमारतीमुळे कोणतीही जिवीत व वित्तहानी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच सदरची इमारत निष्कासीत करण्याबाबतची कार्यवाही आपल्याकडून तात्काळ करण्यात यावी. सदर इमारत पुर्नबांधणी करावयाची

असल्यास याबाबतचा प्रस्ताव विकासकाकडून तयार करून नमुंमपा नगर रचना विभागास सादर करून रितसर परवानगी घेऊनच बांधकामास सुरूवात करावी.

तरी उपरोक्त निर्देशांबाबत कार्यवाही करून छायाचित्रांसह अहवाल या विभागास तात्काळ सादर करावा.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF NAVI MUMBAI
नवी मुंबई महानगर पालिका

Rawade

**सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी**
**बी विभाग कार्यालय नेरुळ**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**प्रत** :– 1. मा. उप आयुक्त (अतिक्रमण) नमुंमपा यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. उप आयुक्त (परिमंडळ-1) नमुंमपा यांना माहितीस्तव सविनय सादर.

Recd on
21/6/2023
RKamble
Rajan Kamble
Chairman
9322406863